पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शिक्षण समिती

कार्यपत्रिका क्रमांक – १६

**सभावृत्तांत**

**दिनांक – २२/०६/२०२०** **वेळ - दुपारी २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा सोमवार दिनांक **२२/०६/२०२०** रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.सागर बाळासाहेब गवळी
३. मा.गायकवाड निर्मला मनोज
४. मा.कदम शशिकांत गणपत
५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.चितळे – सहा.आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) मनपा प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणा-या २ गणवेश, २ पी.टी.गणवेश व १ स्वेटर पुरवठाधारकाबाबत लागलेल्या निकालास वरील न्यायालयात अपिल न करता करारनाम्याप्रमाणे संबंधित निविदाधारकास सन २०२०-२१ करिता साहित्य वाटप आदेश देणेबाबत – मा.सागर गवळी, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक विभागातील शाळेतील इ.५ वी ते ८ वी विद्यार्थ्यांना कोविड-१९ राष्ट्रीय आपत्तीच्या काळात मे.प्रिझम सोल्युशन मार्फत शैक्षणिक मोबाईल ॲप पुरविणेबाबत – मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळांमध्ये वॉटर कुलर बसविणे बाबत – मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील सर्व माध्यमाच्या एकूण २९ बालवाडी शिक्षकांना (मराठी-२०, ऊर्दू-७, इंग्रजी-२) मान्यता देणेबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक विभागातील शाळेत इ.बालवाडी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनामध्ये प्रत्येकी २ केळी देणेबाबत - मा.शशिकांत कदम, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील इ.५ वी ते ८ वी तील सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी आवश्यक शिष्यवृत्ती पुस्तके व प्रश्नसंच पुस्तके सव २०२०-२१ मे.नर्मदा प्रकाशन मार्फत थेट पध्दतीने खरेदी करणेबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय वह्या, विविध अभ्यासपूरक पुस्तके व प्रयोगवही, भूगोल नकाशा वही, शालेय दप्तरे, शालेय स्पोर्टस् काळे बुट मागील दरानेच मागील पुरवठाधारकाकडून तात्काळ थेट पध्दतीने विलंब न करता खरेदी करणेबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागातील बालवाडी शिक्षिकांना मानधनात वाढ करणेबाबत –मा.शशिकांत कदम, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **१९/०३/२०२०** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १५)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ६१ विषय क्रमांक - १

दिनांक - २२/०६/२०२० विभाग – प्राथमिक शिक्षण

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचेकडील पत्र क्र.शिक्षण/सशिअ/कावि/१०४/२०२०, दि.१५/०६/२०२०

शिक्षण विभागाचे शैक्षणिक सत्र दि.१५/०६/२०२० पासून सुरु होत आहे. सद्यस्थितीत संपूर्ण जगात कोरोना या विषाणूचा प्रादूर्भाव अधिक होत असल्याने संपूर्ण जनतेत असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत पिंपरी चिंचवड मनपाच्या प्राथमिक शाळेत शिकणा-या सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण देणे हे आपले कर्तव्य आहे. याकरिता महापालिकेतील तंत्रस्नेही शिक्षक व कार्यरत शिक्षकांच्या मदतीने ऑनलाईन स्वरुपाचा आराखडा तयार केला आहे. एप्रिल महिन्यापासून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून ऑनलाईन शिक्षण पध्दतीचा वापर सुरु केला आहे. परंतु एप्रिल महिन्यामध्ये सर्वच विद्यार्थी सहभागी होवू शकत नसल्याने दि.१५/०६/२०२० पासून १००% विद्यार्थीसह उपक्रम राबविणेकामी प्रस्तावातील नमूद नियोजनास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ६२ विषय क्रमांक - २

दिनांक - २२/०६/२०२०

सुचक : मा.सागर गवळी अनुमोदक : मा.शशिकांत कदम

संदर्भ : मा.सागर गवळी, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव -

मनपा प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थांना वाटप करण्यात येणा-या गणवेश, पी.टी.गणवेश व स्वेटर पुरवठा करणा-या पुरवठाधारकाच्या विरोधात मनपा न्यायालयात गेली असता, न्यायालयाने निविदा अटी-शर्ती व पुरवठाधारकाबरोबर केलेला करारनामा हया सर्व

कागदपत्रांची पाहणी केली असता सर्व कागदपत्रे ही योग्य असल्याचे पाहून सदरचा निकाल पुरवठाधारकाच्या बाजूने दिला आहे. कायदेशीर बाबींची पडताळणी करून न्यायालयाने वादी यांचा मनाई अर्ज न्यायालयाने मंजूर केलेला असल्याने व पुरवठाधारक निविदा दरानेच पुरवठा करण्यास तयार असल्याने सध्याचे वाढलेल्या बाजारभावाचा विचार करता निविदा दरानेच पुरवठा प्राप्त होत असलेल्या पुरवठयाचा विचार करता सदर बाब ही मनपाचे आर्थिक हिताची आहे. सन २०१९-२० चे पुरवठ्याकामी न्यायालयीन प्रक्रीयेमुळे सदरचे साहित्य वाटपास विलंब झालेला होता. मा.स्थायी समिती यांनी ठराव क्र.६९७९ दिनांक - ११/०३/२०२० अन्वये मागील पुरवठाधारकाकडून सदर साहित्याबाबत विद्यार्थांची कोणतीही गैरसोय होऊ नये याकरिता खरेदी करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच मा.अति.आयुक्त (१) यांचे दि.१०/०७/२०१९ च्या प्रशासकीय मान्यतेच्या शेरांकनानुसार मा.सत्र न्यायालय पुणे यांच्या अंतरिम आदेशास अधिन राहून कार्यवाही करावी असे नमूद केले आहे. त्यानुसार मा.सत्र न्यायालयाने सदर दाव्यावर Intereme Injuction अन्वये पूर्वीच्या करारनाम्यानुसार कार्यवाही करणेबाबत न्यायालयाचे आदेश झाले आहेत. गेली चार वर्ष करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार संबंधित ठेकेदाराकडून विनातक्रार सदर साहित्याचे वाटप करण्यात आलेले आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे उत्पादन प्रक्रीयेमध्ये व्यत्यय निर्माण झालेला आहे. न्यायालयात अपील केलेस खरेदी प्रक्रियेवर परिणाम होऊ शकेल तसेच विद्यार्थास वेळेत गणवेश, पी.टी. गणवेश व स्वेटर पुरवठा न झाल्यास त्याचा मनपाचे प्रतिमेवर परिणाम होईल. मा.सभापती, शिक्षण समिती व शिक्षण समिती सदस्य यांनी ही अपीलात न जाता न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही करणेचे कळविले आहे. तसेच पुरवठाधारकाने पुरवठा साहित्य पुरवठा करणेस उपलब्ध असलेबाबत कळविलेले आहे. मागील वर्षी ही पुरवठा आदेश आपल्यामार्फत उशिरा दिल्याने सदर साहित्य विद्यार्थांना वाटप करण्यास विलंब झाला होता. इत्यादीमुळे सध्याचे पुरवठाधारकाकडूनच सदर साहित्य वेळेत उपलब्ध होणे शक्य असल्याने मा.सत्र न्यायालय, पुणे यांचा वादीचे बाजूने लागलेला Intereme Injuction निर्णय मान्य करून पुढे अपिलात न जाता निविदा अटी शर्ती प्रमाणे व करण्यात आलेल्या करारनाम्याप्रमाणे संबंधित निविदाधारकास सन २०२०-२१ करिता साहित्य वाटप आदेश त्वरित देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६३ विषय क्रमांक - ३

दिनांक - २२/०६/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

संदर्भ : मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव -

सध्या भारतासह संपूर्ण जगभरात सर्वत्र कोरोना रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात झाला आहे. त्यामुळे भारतात संपूर्ण लॉकडाऊन करण्यात आलेले आहे. शाळा, महाविद्यालये ही बंद करण्यात आलेली आहेत. शाळा सुरु करण्याबाबत अद्यापही कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. शैक्षणिक वर्ष १५ जून २०२० रोजी सुरु झाले असल्याने विद्यार्थांना ऑनलाईन शिक्षण देण्यात येत आहे. मे.प्रिझम सोल्युशन, प्राधिकरण निगडी या संस्थेमार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक विभागातील शाळेतील इ. ५ वी ते इ. ८ वी विद्यार्थांसाठी अभ्यासासाठी 'आयडियल स्टडी' मोबाईल ॲप तयार करण्यात आलेले असून त्याबाबत त्यांनी प्रस्ताव सादर केला आहे. त्यामध्ये अभ्यासाचे तंत्र पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय यांची योग्य उत्तरे विज्ञान व गणित

विषयातील प्रत्येक पाठाचा संपूर्ण संदर्भ व उपयुक्त माहिती देणारा व्हिडिओ सरावासाठी भरपूर प्रश्नपत्रिका ही सर्व माहिती दिली आहे. दैनदिन अभ्यास करण्यासाठी हे मोबाईल अँप मार्गदर्शक आहे. सदर मोबाईल अँपचे वार्षिक शुल्क प्रति विद्यार्थी र.रु.३००/- (वस्तू आणि सेवा कर सहित ) कळविला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक विभागातील शाळेतील इ. ५ वी ते इ. ८ वी विद्यार्थांना कोविड-१९ राष्ट्रीय आपत्तीच्या काळात मे.प्रिझम सोल्युशन मार्फत शैक्षणिक मोबाईल अँप खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिति सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६४ विषय क्रमांक - ४

दिनांक - २२/०६/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

संदर्भ : मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. तसेच विद्यार्थांच्या आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळांमध्ये शालेय विद्यार्थांना शुध्द पिण्याचे पाणी पिण्यासाठी सोय करणे अत्यावश्यक असल्याने प्राथमिक शाळांमध्ये वॉटर कुलर बसविणे आवश्यक आहे. शिक्षण विभागाचे सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात वॉटर फिल्टर बसविणे या लेखाशिर्षावर र.रु.१ कोटी तरतूद करणेत आलेली आहे. यासाठी प्राथमिक शिक्षण विभागामार्फत वॉटर कुलर बसविण्याबाबत कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६५ विषय क्रमांक - ५

दिनांक - २२/०६/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

संदर्भ : मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत २०७ बालवाडी चालविल्या जातात. तसेच २०७ बालवाडी शिक्षिका कार्यरत आहेत. काही शाळांमध्ये बालवाडीची विद्यार्थी पट संख्या जास्त असल्याने त्यासाठी २९ बालवाडी शिक्षिका (मराठी - २०, उर्दू - ७, इंग्रजी - २) आवश्यकता आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील २९ बालवाडी शिक्षिकाना (मराठी - २०, उर्दू - ७, इंग्रजी - २) मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६६ विषय क्रमांक - ६

दिनांक - २२/०६/२०२०

सुचक : मा. शशिकांत कदम अनुमोदक : मा. निर्मला गायकवाड

संदर्भ : मा. शशिकांत कदम, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत शाळेतील इ.बालवाडी ते इ.८ वी मधील विद्यार्थांना मागील १४ वर्षापासून अन्नामृत फाउंडेशन (इस्कॉन) मार्फत सकस पोषण आहार यशस्वीरित्या पुरविला जातो. सदर पुरवठाधारकाकडून शुध्द व निर्जंतुक पद्धतीने बनवून विद्यार्थांना वाटलाही जातो. त्याच अनुषंगाने मे.अन्नामृत फाउंडेशन (इस्कॉन) यांच्यामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक विभागातील शाळेत इ. बालवाडी ते इ. ८ वी च्या विद्यार्थांना सन २०२०-२१ करिता अन्नामृत फाउंडेशन (इस्कॉन) मध्यान्ह भोजनामध्ये प्रत्येकी २ केळी वाटण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झाला असून प्रत्येकी विद्यार्थी २ केळी साठी र.रु. ६/- खर्च कळविला आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक विभागातील शाळेत इ. बालवाडी ते इ. ८ वी च्या विद्यार्थांना सन २०२०-२१ करिता अन्नामृत फाउंडेशन (इस्कॉन) मध्यान्ह भोजनामध्ये प्रत्येकी २ केळी वाटप करण्यास व त्यासाठी येणारा खर्च विद्यार्थी आरोग्य या लेखाशिर्षावरील उपलब्ध तरतूद र.रु.२ कोटी मधून करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६७ विषय क्रमांक - ७

दिनांक - २२/०६/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

संदर्भ : मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील इ. ५ वी व इ. ८ वी तील विद्यार्थी दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षेस बसतात. महानगरपालिकेतील विद्यार्थी हे गरीब असून त्यांची घरची आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्याने सदर शिष्यवृत्ती परीक्षेस लागणा-या अभ्यासक्रमाची पुस्तके ते घेऊ शकत नाहीत परिणामी त्याचा त्यांच्या निकालावर परिणाम होतो. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी आवश्यक शिष्यवृत्ती पुस्तके व प्रश्नसंच पुस्तके पुरविणेकामी मे.नर्मदा प्रकाशन मार्फत प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर पुस्तकात शिष्यवृत्ती परीक्षेस बसणा-या विद्यार्थांना अभ्यासासाठी उपयुक्त आदर्श सराव प्रश्न आणि सूचक स्पष्टीकरणासह उत्तरसूची केलेली आहे. तरी मे.नर्मदा प्रकाशन मार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील इ.५ वी व इ.८ वीतील सर्व विद्यार्थांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी आवश्यक शिष्यवृत्ती पुस्तके व प्रश्नसंच पुस्तके सन २०२०-२१ साठी थेट पद्धतीने खरेदी करण्यास

मान्यता देणेत येत आहे. सदरचा खर्च स्कॉलरशिप परिक्षा या लेखाशिर्षावरील उपलब्ध तरतूद र.रु.२०,००,०००/- मधून करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६८ विषय क्रमांक - ८

दिनांक - २२/०६/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

संदर्भ : मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थांकरिता प्रति वर्षी शालेय उपयोगी साहित्य वाटप करण्यात येत असते. तरी पिंपरी चिंचवड शहरामध्ये मोठ्या प्रमाणात कोरोना रोगाचा प्रसार होत असल्याने शालेय साहित्य खरेदी करणेकामी नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सध्याची कोविड-१९ उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये निविदा मागविणे शक्य वाटत नाही तसेच अशा परिस्थितीत अनेक उद्योगधंदे बंद पडलेले आहेत त्यामुळे महागाई वाढलेली आहे तरी सद्यपरिस्थितीचा विचार करता शैक्षणिक साहित्य निविदा प्रक्रिया नव्याने न राबविता मागील पुरवठाधारक यांनाच कामकाजाबाबत पुन्हा त्वरित आदेश देऊन शैक्षणिक साहित्य वाटप करणेकामी कळविण्यात यावे. विभागातल्या पूर्वीच्याच पुरवठाधारकास कामाचा अनुभव असल्याने त्यांच्या कडून सदर साहित्य मागील दरानेच घेणे महानगरपालिकेच्या आर्थिक फायदाचे आहे. तसेच सदर साहित्य मागील दरानेच पुरविण्याबाबत तयार असल्याचे ही कळविले आहे. वरील सर्व बाबींमुळे विद्यार्थांना वेळेत साहित्य ही मिळेल व त्यांचे शैक्षणिक नुकसान ही होणार नाही. तरी वरील विषयाबाबत सध्यस्थिती पाहता तात्काळ पुरवठा आदेश विनाविलंब देण्यात यावेत. सदर साहित्य पुरवठा करताना आदेश प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांमध्ये सदर साहित्य विद्यार्थांना मिळावे अशी अट टाकण्यात यावी. शालेय शिक्षण साहित्य खरेदीकामी मध्यवर्ती भांडार विभागाने निविदा / कोटेशन प्रसिध्द करुन दरपत्रके मागविण्यात आली होती. तथापि, पुरवठाधारकांच्या कागदपत्रांची पडताळणी केली असता त्यामध्ये एकाच पुरवठा धारकाने दोन दरपत्रके सादर केल्याचे दिसून आले. त्यामध्ये दोघा पुरवठा धारकांच्या एकच प्रकारच्या सहया, मोबाईल नंबर दिसून आल्याने रिंग झाल्याचे प्रथमदर्शी मध्यवर्ती भांडार विभागाच्या निदर्शनास आलेबाबत मा.सहा.आयुक्त, मध्यवर्ती भांडार यांनी सांगितले असून फेर कोटेशन काढल्याचे सांगितले आहे. त्यामुळे शालेय शिक्षण साहित्य खरेदीस होणारा विलंब विचारात घेता सदर शालेय साहित्य थेट पध्दतीने खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी प्राथमिक शाळेतील विद्यार्थांना शालेय वह्या, विविध अभ्यासपूरक पुस्तके व प्रयोगवही, भूगोल नकाशा वही, शालेय दफ्तरे, शालेय बूट मागील दरानेच मागील पुरवठाधारकाकडून तात्काळ खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्राथमिक शाळेतील इ.१ ली ते ८ वी तील सर्व विद्यार्थी विद्यार्थींना शालेय पटानुसार प्रति विद्यार्थी / विद्यार्थींना शालेय बुट व मोजे स्पोर्ट काळे अधिक पांढरे स्कॉस २ जोड इ.१ ली ते ८ वी मे.साई मार्केटींग यांचेकडून सदर साहित्याबाबत विद्यार्थ्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये व सदर साहित्य शाळा सुरु होताना पुरविणे आवश्यक आहे. सध्याची कोविड-१९ ची परिस्थिती पहाता निविदा प्रक्रिया राबविण्यात वेळ जास्त लागेल व माल पुरवठा वेळेत न झाल्यास विद्यार्थी / विद्यार्थींनीचे हाल होतील. तरी पिं.चिं.मनपाने मागविलेले कोटेशन नोटिस क्र.५३/२०२०-२१ (अंदाजित दरांसाठी) नुसार मे.साई मार्केटींग यांचेकडून पुढील कालावधीसाठी नव्याने करारनामा

करुन पुरवठा आदेश देऊन खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चाच मान्यता देणेत येत आहे. तसेच विद्यार्थी पादत्राणे हा खर्च प्राथमिक शिक्षण विभागाकडील विद्यार्थी बुट / पादत्राणे या लेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेत येत आहे.  सभावृत्तांत कायम होणेची वाट न ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६९ विषय क्रमांक - ९

दिनांक - २२/०६/२०२०

सुचक : मा. शशिकांत कदम अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ : मा. शशिकांत कदम, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागात २०७ बालवाडी शिक्षिका ह्या गेली अनेक वर्षापासून कमी मानधनावर काम करीत आहेत. सध्याच्या  काळात कमी मानधनात बालवाडी शिक्षिकांना उदरनिर्वाह करणे अशक्य आहे. तरी बालवाडी शिक्षिकांना त्यांच्या सेवेनुसार खालीलप्रमाणे मानधनात वाढ करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सध्याची बालवाडी शिक्षिका मानधन

| अ. क्र | कालावधी | मानधन ( र.रु) |
|---|---|---|
| १ | ० ते ५ वर्ष | ७,०००/- |
| २ | ६ ते १० वर्ष | ८,०००/- |
| ३ | ११ ते १५ वर्ष | ९,०००/- |
| ४ | १६ ते २० वर्ष | १०,०००/- |
| ५ | २१ ते २५ वर्ष | ११,०००/- |
| ६ | २६ ते ३० वर्ष | ११,०००/- |

सध्याची मागणी बालवाडी शिक्षिका मानधन

| अ. क्र | कालावधी | मानधन ( र.रु) |
|---|---|---|
| १ | ० ते ५ वर्ष | ९,०००/- |
| २ | ६ ते १० वर्ष | ११,०००/- |
| ३ | ११ ते १५ वर्ष | १३,०००/- |
| ४ | १६ ते २० वर्ष | १५,०००/- |
| ५ | २१ ते २५ वर्ष | १७,०००/- |
| ६ | २६ ते ३० वर्ष | १९,०००/- |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(पवार मनिषा प्रमोद)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१९४/२०२०
दिनांक : २३/०६/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.